करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. 121

महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१

Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. २६/०३/२०२०

वाचले:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५

२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०

३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०

४) साथ रोग अधिनियम १८९७

५) महाराष्ट्र शासनाकडील अधिसूचनां क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३/०३/२०२०

६) या कार्यालयाकडील समक्रमांकाचे आदेश दि.२४/०३/२०२० आदेश क्रमांक ९८

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे. करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाय योजनां करण्यात येत आहेत.

उक्त संदर्भ क्र.५ कडील अधिसूचनेव्दारे अत्यावशक सेवा वगळण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये बँकींग क्षेत्राचा उल्लेख आहे. त्यानूसार या कार्यालयाकडील आदेश क्र.९८ अन्वये अत्यावशक सेवा चालू ठेवायचे आदेश दिलेले असतानाही जिल्हयात बऱ्याचशा बँकीग सेवा हया सूरळित कार्यरत नाहीत असे दिसून येत आहे.

त्याअर्थी, मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड मला उपोदघातातील अ.क्र.३कडील नमूद अधिसूचनेव्दारे प्राप्त झालेल्या अधिकारानूसार जिल्हयातील सर्व शासकीय बँका/एटीएम सुविधा व इतर बँकिंग सुविधा सूरळितपणे कार्यान्वित ठेवण्याचे आदेश देत आहे. करोना विषाणूबाबतची सर्कतता पाळून जिल्हयातील सर्व बँक, ए.टी.एम.च्या सुविधा पूर्वीप्रमाणे सुरु ठेवाव्यात.

याबाबत हयगय अथवा हलगर्जीपणा करु नये. असे केल्याचे निर्दशनास आल्यास संबंधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५६ तसेच भारतीय दंड संहिता, १९६० चे कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग Collector Raigad-Alibag

(निधी चौधरी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

**प्रति,**

१. लीड बँक व्यवस्थापक, रायगड जिल्हा

२. उपविभागीय अधिकारी (सर्व)
२/- तत्काळ सर्व बँक व्यवस्थापकांची बैठक घेवून सर्व सेवा सुरळित सुरु राहतील असे पहावे व कार्यपूर्ती अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. तहसिलदार (सर्व)
२/- तत्काळ सर्व बँक व्यवस्थापकांची बैठक घेवून सर्व सेवा सुरळित सुरु राहतील असे पहावे व कार्यपूर्ती अहवाल या कार्यालयास सादर करावा.